# मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

'शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही' या महात्मा ज्योतिराव फुले यांच्या क्रांतिकारी विचाराने महाराष्ट्रातील बहुजन समाजात शिक्षणविषयक जागरुकता निर्माण केली. याच विचारांचा पाठपुरावा राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.पंजाबराव देशमुख आदी विचारवंत - समाजसुधारकांनी केला. खेड्यापाड्यांत पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालये उघडल्याशिवाय व अग्रक्रमाने उच्च शिक्षण देणारी महाविद्यालये काढल्याशिवाय शिक्षणाचा प्रकाश पोहोचणार नाही, ही धारणा या समाजधुरिणांची होती. त्यांच्या परंपरेचे पाईक होऊन कर्मवीर रावसाहेब थोरात, कर्मवीर गणपतदादा मोरे, कर्मवीर डी.आर.भोसले आदी कार्यकर्त्यांनी नाशिक जिल्ह्यातील शिक्षणप्रसाराच्या कार्याचा वसा घेतला. १९१४ साली 'उदोजी मराठा वसतिगृह' स्थापन करून या महत्कार्याची मुहूर्तमेढ रोवली. १९१३ साली अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या नाशिक येथील अधिवेशनात धार संस्थानाचे राजे श्रीमंत उदोजीराव पवार यांनी रुपये १०,०००/- ची देणगी देऊन संस्थेचा पाया तर भक्कम केलाच पण संस्था सुस्थिर व्हावी हा दृष्टिकोन ठेवून रू.२०००/- चे वार्षिक अनुदानही सुरू केले. राजर्षी शाहू महाराज यांनी रू.१५०००/-, श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांनी रू.१२०००/-, ग्वाल्हेर नरेश श्रीमंत माधवराव महाराज यांनी रू.१०,०००/- व उद्योजक पांडुरंग जावजी चौधरी प्रभूती यांनी रू.३,०००/- अशा अनेक शिक्षणप्रेमी महानुभावांनी त्याकाळी देणग्या देऊन संस्थेच्या कार्यविस्तारास हातभार लावला.

'बहुजन हिताय। बहुजन सुखाय।।' हे ब्रीद अंगीकारलेल्या संस्थेच्या कार्यास मदतीचा हातभार लावण्यासाठी तत्कालीन सामाजिक कार्यकर्ते शंकरराव कदम कातरणीकर, विठ्ठलराव गाढवे, किर्तीवानराव निंबाळकर, विठोबा पाटील कानळदकर, भाऊसाहेब हिरे, काकासाहेब वाघ, आण्णासाहेब मुरकुटे हे पुढे आले. अनेक ठिकाणच्या दानशूर व्यक्तींमुळे आणि शिक्षणप्रेमी सामाजिक कार्यकर्त्यांमुळे संस्थेचा विस्तार झपाट्याने झाला. सन १९६४ साली संस्थेचे सुवर्ण महोत्सव, सन १९८९ साली अमृत महोत्सव साजरे झाले. २०१४ साली संस्थेचा शताब्दी महोत्सव साजरा झाला. १०६ वर्षांची दीर्घ परंपरा समृध्द करण्यात संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी आणि कार्यकारी मंडळातील सर्व सदस्यांचे योगदान मोलाचे आहे.

संस्थेच्या या शैक्षणिक व सामाजिक जनसेवेबद्दल २००० साली महाराष्ट्र शासनाने संस्थेला सर्वोत्तम शैक्षणिक संस्थेसाठीचा राज्य पुरस्कार देऊन गौरविले आहे. २००६ साली यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाने प्रवर्तित केलेला 'पंजाबराव देशमुख पुरस्कार' देऊन संस्थेची प्रशंसा केली आहे.



Scanned by CamScanner

# मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

शिवाजीनगर, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ००२.

## * संस्था दृष्टिक्षेपात *

| | |
|---|---|
| स्थापना | सन १९१४ |
| सार्वजनिक ट्रस्ट | रजि. नं. ए- ४३६/१९५४ |
| आजीव सभासद संख्या (जनरल) | १०,२९१ |
| आजीव सभासद संख्या (सेवक) | ४९९ |
| शाखांची संख्या | ४८७ |
| विद्यार्थ्यांची संख्या | २,११,४१९ |
| सेवक संख्या | ९,६४१ |
| अंदाजपत्रक | सुमारे रु. ८०१ कोटी ०९ लाख (२०२१-२२) |

## * शाखा विस्तार *

| | | | |
|---|---|---|---|
| पूर्व प्राथमिक शाळा (मराठी माध्यम) | ७३ | प्रिंटींग प्रेस | ०१ |
| पूर्व प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | १५ | आय.टी.आय. | ०८ |
| प्राथमिक शाळा (मराठी माध्यम) | ७० | मेडिकल कॉलेज | ०१ |
| प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | १६ | मेडिकल कॉलेज हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर | ०१ |
| आश्रमशाळा (प्राथमिक) | ०३ | विद्यार्थी वसतिगृहे | २२ |
| आश्रमशाळा (माध्यमिक) | ०२ | कृषी विद्यालय | ०१ |
| माध्यमिक शाळा (मराठी माध्यम) | १५८ | ललितकला महाविद्यालय | ०१ |
| माध्यमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | ०८ | जनशिक्षण संस्थान | ०१ |
| उच्च माध्यमिक विद्यालये | ६३ | पदविका फार्मसी महाविद्यालय (डी फार्म) | ०१ |
| अध्यापक विद्यालये | ०४ | परिचारिका प्रशिक्षण महाविद्यालय | ०१ |
| शिक्षणशास्त्र महाविद्यालये | ०१ | अभियांत्रिकी महाविद्यालय | ०१ |
| कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये | २२ | कृषी महाविद्यालय | ०१ |
| फार्मसी कॉलेज | ०१ | भौतिकोपचार महाविद्यालय | ०१ |
| आर्किटेक्चर कॉलेज | ०१ | विधी महाविद्यालये | ०१ |
| बॅचलर ऑफ डिझाईन | ०१ | समाजकार्य महाविद्यालय | ०१ |
| नर्सिंग कॉलेज | ०१ | पॉलिटेक्निक कॉलेज | ०१ |
| व्यवस्थापन संस्था (आय.एम.आर.टी.) | ०१ | नागरी आरोग्य केंद्र | ०१ |
| मविप्रचे प्रशिक्षण व विकास केंद्र | ०१ | ग्रामीण आरोग्य केंद्र | ०१ |
| | | **एकूण** | **४८७** |



Scanned by CamScanner

मराठा विद्या प्रसारक समाजाचे

# कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे
# कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

उत्तमनगर, सिडको, ता.जि. नाशिक.

# माहितीपत्रक : २०२२ - २३
## वरिष्ठ महाविद्यालय

**महाविद्यालयासंबंधी :**

कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे महाविद्यालयाची स्थापना जून १९९३ मध्ये झाली. प्रारंभी कला, विज्ञान आणि वाणिज्य या तीन विद्याशाखा असलेल्या या महाविद्यालयात जून १९९७ पासून संगणक विज्ञान शाखेच्या अभ्यासक्रमाची सोय करण्यात आली. आज महाविद्यालयात कला, विज्ञान, वाणिज्य, संगणकशास्त्र शाखेतील पदवी तसेच बी.व्होक अंतर्गत पदवी, पदविका व प्रमाणपत्र कोर्सेस व पदव्युत्तरपर्यंत शिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे.

जून १९९७-९८ पासून बी.सी.एस. (सध्याचा बी.एस्सी. संगणकशास्त्र) हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. महाविद्यालयात एम.ए., एम.कॉम आणि एम.एस्सी. या वर्गाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सोय आहे. शै.वर्ष २०१८-१९ पासून विद्युत उपकरणे निगा व दुरूस्ती आणि अन्नप्रक्रिया तंत्रज्ञान हे बी.व्होक. कोर्सेस सुरू करण्यात आले आहे.

आज या महाविद्यालयात ३२०० विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत. शहरातील सामाजिक भान जपणारे एक उपक्रमशील महाविद्यालय म्हणून महाविद्यालयाने नावलौकिक मिळविला आहे.

**महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये :**

महाविद्यालय स्वतंत्र, भव्य आणि आकर्षक इमारतीत सुमारे ५,२२४ चौ.मी. जागेत स्थिरावले आहे. शिस्तप्रिय आणि शैक्षणिक वातावरण ही महाविद्यालयाची वैशिष्ट्ये आहेत.

**प्राध्यापक वर्ग :**

महाविद्यालयीन शिक्षण क्षेत्रात अनुभवी व आपापल्या विषयांत तज्ज्ञ असलेला, विद्यार्थी वर्गाबद्दल आस्था बाळगणारा उच्च विद्याविभूषित, उत्साही, कार्यक्षम प्राध्यापक वर्ग महाविद्यालयास लाभला आहे.



Scanned by CamScanner

**समृद्ध ग्रंथालय व अभ्यासिका कक्ष :**

ग्रंथालय हा शैक्षणिक संस्थेचा अत्यंत महत्त्वाचा भाग असतो. या जाणिवेने महाविद्यालयाचे ग्रंथालय हे सर्व विषयातील पाठ्यपुस्तके व संदर्भग्रंथ यांनी समृद्ध आहे. ग्रंथालयाचा कारभार संगणकाद्वारे चालतो. आजमितीला वरिष्ठ महाविद्यालयासाठी ३५६८९ एवढी ग्रंथसंपदा उपलब्ध आहे. यामध्ये क्रमिक पुस्तके व संदर्भ ग्रंथ समाविष्ट आहेत. याव्यतिरिक्त ५८ नियतकालिके, १५३ शब्दकोश, ४० शोधप्रबंध, २१२ सीडीज आणि २० वर्तमानपत्रांचा समावेश आहे. राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील नियतकालिके, स्थानिक/राज्यपातळीवरील वर्तमानपत्रे/साप्ताहिके, नोकरी मार्गदर्शन, व्यवसाय मार्गदर्शन, उद्योजक विकासपत्रिका यामुळे ग्रंथालय समृध्द आहे. याव्यतिरिक्त ग्रंथालयाने INFLIBNET या संस्थेची N-List आणि NISSAT, Department of Scientific and Industrial Research, Government of India चे DELNET याद्वारे ऑनलाईन, E-Journals, E-Books, E-Thesis & Dissertation, आंतर ग्रंथालयीन पुस्तक देवघेव सेवा या सुविधांची उपलब्धता करून दिलेली आहे. ग्रंथालयात प्राध्यापकांसाठी स्वतंत्र वाचन कक्ष आहे तसेच विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वाचन कक्ष असून त्यात २०० विद्यार्थी एकाच वेळेस बसू शकतात.

**ग्रंथालयाची वेळ खालीलप्रमाणे आहे.**

| | | |
|---|---|---|
| कार्यालयीन दिवशी | – | सकाळी ७.३० ते संध्याकाळी ६.०० |
| परीक्षेच्या कालावधीत (फेब्रु. ते मे) | – | सकाळी ७.०० ते संध्याकाळी ६.०० |
| रविवार व सुट्टीच्या दिवशी | – | सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.०० |

ग्रंथालयात पुस्तक पेढीचीही सुविधा उपलब्ध आहे.

**पुस्तक पेढी :**

विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे सहाय्य करण्यासाठी पुस्तकपेढी (बुक बँक) सुविधा सुरु आहे. गरीब व अभ्यासू विद्यार्थ्यांना या पेढीतून वर्षभर वापरण्यासाठी पाठ्यपुस्तके दिली जातात. अशी पुस्तके मिळविण्यासाठी गरजूंनी ग्रंथपालाशी संपर्क साधणे गरजेचे आहे.

**दृकश्राव्य कक्ष :**

विद्यार्थ्यांना अद्ययावत व परिपूर्ण ज्ञान मिळावे यासाठी महाविद्यालयाने स्वतंत्र दृकश्राव्य कक्ष सुरू केला आहे. यात अत्याधुनिक दृकश्राव्य माध्यमे (सीडी, एलसीडी, इंटरनेट, कॉम्प्युटर, टेलीव्हिजन इ.) ठेवलेली असून विहित वेळापत्रकानुसार विद्यार्थी या ज्ञानस्त्रोताचा उपभोग घेवू शकतात.

**एकता :**

विद्यार्थ्यांच्या वाङ्मयीन गुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्यातील लेखन कौशल्याला हक्काचे व्यासपीठ देण्याच्या दृष्टीने महाविद्यालय 'एकता' नियतकालिक प्रकाशित करत असते. यात विद्यार्थ्यांचे लेख,



Scanned by CamScanner

कथा, कविता, ललित, अनुभव या स्वरूपाचे लेखन प्रसिध्द करण्यात येते. गेल्या काही वर्षांपासून एक सूत्र ठेऊन विशेषांक काढले जात आहेत.

**संगणक व इंटरनेट सुविधा :**

महाविद्यालयात कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील सर्व विषयांसाठी स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आलेले आहेत. त्या कक्षांमध्ये विभागप्रमुख व विषयशिक्षक कामकाज करीत असतात. विज्ञान विभागासाठी प्रत्येक विषयाच्या स्वतंत्र-पुरेशा प्रयोगशाळा असून सर्वच ठिकाणी संगणक, इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे. महाविद्यालयात १०० पेक्षा अधिक अद्ययावत संगणक उपलब्ध आहेत. ब्रॉडबॅण्ड इंटरनेट, लॅनची सुविधा प्राध्यापकांसाठी तसेच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करण्यात आलेली आहे. कार्यालयीन कामकाज १००% संगणकीकृत झालेले असून महाविद्यालयात विद्यार्थी-सेवक यांच्यासाठी Wi-Fi ची सुविधा उपलब्ध आहे.

**परीक्षा विभाग :**

या महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ विभागासाठी स्वतंत्र परीक्षा विभाग आहेत. दोन्ही परीक्षा विभागांमध्ये संगणक, इंटरनेट सेवा, झेरॉक्सची सोय उपलब्ध आहेत. दोन्हीही विभागाच्या परीक्षांचे कामकाज अत्यंत सुरळीतपणे शिस्तबद्धरीत्या सुरू असते. परीक्षेबद्दलच्या अडी-अडचणी, तक्रारी या विभागाद्वारा निवारण केल्या जातात. परीक्षेसंदर्भातील परिपत्रके, रेकॉर्ड व्यवस्थितरित्या ठेवले जाते. टर्म-एण्ड व अंतर्गत परीक्षांचे कामकाजही व्यवस्थितरित्या चालते. परीक्षेसंदर्भातील मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले जाते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने २०१०-२०११ पासून एफ.वाय.बी.ए./ एफ.बी.कॉम./ एफ.वाय.बी.एस्सी/एफ.वाय.बी.एस्सी संगणकशास्त्र या वर्गाच्या परीक्षा महाविद्यालयकडे सूपूर्त केलेल्या आहेत. त्या संदर्भात परीक्षा विभागाकडून वेळोवेळी सूचना काढण्यात येतात. **२०१९-२० प्रथम वर्षाकरीता आणि २०२०-२१ पासून द्वितीय वर्षाकरीता विद्यापीठाने निवड आधारीत श्रेयांक पद्धती लागू करण्यात आली आहे.**

**नोकरी मार्गदर्शन केंद्र :**

महाविद्यालयात विविध कंपन्याना कॅम्पस इंटरव्ह्यु (मुलाखती) साठी आमंत्रित करण्यात येते.

| | |
|---|---|
| INFOSYS | WIPRO TECHNOLGIES |
| TCS | ZEE TV L&T INFOTECH |
| WOCKHARDT | PATNI COMPUTERS |
| WNS SYSTEMS PVT.LTD | KALE SYSTEMS |
| EUREKA FORBES | MICO |
| ABB | MAHINDRA & MAHINDRA |
| NANDI FOUNDATION | BAJAJ FINANCE |

**जिमखाना :**

महाविद्यालयाकडे अद्ययावत असा जिमखाना आहे. हा विभाग आधुनिक सामुग्रींनी युक्त आहे. जिमखान्यातर्फे दरवर्षी व्हॉलीबॉल, स्विमिंग, वॉटरपोलो, अॅथलॅटीक्स, ज्युदो, कुस्ती, वेटलिफ्टिंग, योगा, मल्लखांब, पॉवर लिफ्टिंग, स्कॅश रॅकेट, कबड्डी, हॉकी, क्रिकेट इ.खेळांच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते.



Scanned by CamScanner

योग अभ्यास वर्ग शिकवला जातो. म.वि.प्र.तर्फे घेण्यात येणाऱ्या मॅरेथॉन स्पर्धेत आमचे विद्यार्थी दरवर्षीच नेत्रदीपक यश मिळवितात. जिमखाना विभागाचे वैशिष्ट्ये म्हणजे मल्टीस्टेशन जिम व स्वयंसिद्धा ही विद्यार्थिनींची प्रशिक्षित टीम. तसेच व्हॉलीबॉलमध्ये महाविद्यालयाने विशेष लौकिक मिळविला आहे. जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून ५,००,०००/- रू. ग्रिन जिमसाठी, ७,००,०००/- रू. बास्केट बॉल मैदान आणि १,००,०००/- रू. सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अनुदान स्वरूपात प्राप्त झाले आहे.

### आरोग्य सेवा केंद्र :

महाविद्यालयात सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी संस्थेच्या वैद्यकीय महाविद्यालयतर्फे तज्ज्ञ डॉक्टरामार्फत आरोग्य तपासणी केली जाते. एड्स जागृती, दंतचिकित्सा, विद्यार्थिनींच्या आरोग्यविषयी तक्रारी, तंबाखू-गुटख्याचे दुष्परिणाम, युवकांची व्यसनाधिनता या विषयावर विविध डॉक्टरांची व्याख्याने व प्रत्येक सत्रात एक रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते.

### विद्यार्थी विमा योजना / स्टूडंट मेडिक्लेम पॉलिसी :

महाविद्यालयात सर्व विद्यार्थ्यांकरीता 'न्यू इंडिया इन्शुरन्स' कंपनीची सामूहिक मेडीक्लेम व वैयक्तिक अपघाती विमा पॉलिसी काढली जाते. यामध्ये विद्यार्थ्यांचा मेडीक्लेम पॉलिसी योजनेत समावेश असेल. विद्यार्थ्यांना नाममात्र शुल्कात ही विमा योजना उपलब्ध करून दिली जाते.

| अ.क्र | मेडिक्लेम विमा पॉलिसी योजने अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी हॉस्पिटलायझेशन खर्चासाठी मिळणारी रक्कम | अपघाती विमा योजने अंतर्गत वडीलांच्या अपघाती मृत्यूनंतर विद्यार्थ्यास मिळणारी रक्कम रु. | अपघाती विमा योजने अंतर्गत आईच्या अपघाती मृत्यूनंतर विद्यार्थ्यास मिळणारी रक्कम रु. | अपघाती विमा योजने अंतर्गत विद्यार्थ्याच्या अपघाती मृत्यूनंतर पालकांस मिळणारी रक्कम रु. | विम्याचा वार्षिक हप्ता रु. | विमा पॉलिसी मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५०,०००/- | २,००,०००/- | १,००,०००/- | १,००,०००/- | १७१ /- | १ वर्ष |

### स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन :

महाविद्यालयात स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन केंद्र सुरू आहे. ग्रंथालयात युपीएससी, एमपीएससी, नेट, सेट, गेट, केमियाड, ऑलिम्पीयाड, बँकिंग यांच्या प्रवेश परीक्षांसाठी आवश्यक असणारे ग्रंथसंपदा उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील विषयतज्ज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातात. महाविद्यालयातील प्राध्यापकही विद्यार्थ्यांना सतत मार्गदर्शन करीत असतात. महाविद्यालयात दरवर्षी सामान्यज्ञान स्पर्धा आयोजित करून विजेत्यांना रोख रक्कम व पुस्तक स्वरूपात बक्षिसे देण्यात येतात.

### यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र :

महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र असुन दर वर्षी हजारो वंचित / काम करणारे विद्यार्थी परीक्षा देऊन पदवी प्राप्त करतात. 'कॉपीमुक्त केंद्र' म्हणून महाविद्यालयाने लौकिक कमावला आहे. सुमारे २००० गरजू व होतकरू विद्यार्थी या केंद्रातुन दरवर्षी शिक्षण घेतात.



Scanned by CamScanner

**एन.सी.सी./ राष्ट्रीय छात्र सेना / रोव्हर रेंजर :**

महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एन.सी.सी.) ट्रेनिंगची सोय आहे. आर्मी, नेव्ही व एअर विंग्जसाठी लागणाऱ्या ट्रेनिंगचा समावेश आहे. 'बी' व 'सी' सर्टिफिकेट परीक्षेची सुविधाही विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जाते. जनजागृती रॅली, रक्तदान शिबिर इ.उपक्रमही राबविले जातात.एन.सी.सी.मध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठीय परीक्षेत ५ गुणांचा फायदा दिला जातो. रोव्हर रेंजरच्या छात्रासाठी शासकीय सेवेत ५% जागा राखीव असतात. महाविद्यालयाच्या अनेक विद्यार्थीनींची राज्य, राष्ट्रीय स्तरावरील शिबिरासाठी निवड होते. तसेच वेगवेगळ्या सामाजिक कामातही त्यांचा सक्रिय सहभाग असतो.

**एन.एस.एस./राष्ट्रीय सेवा योजना :**

महाविद्यालयाच्या वरिष्ठ विभागात राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) राबविली जाते. वरिष्ठ स्तरावर २५० विद्यार्थ्यांचे युनिट आहे. ग्रामसफाई, वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, जलसाक्षरता, ऊर्जाबचत जागृती, अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता अभियान, एड्स जनजागृती, इ.उपक्रम घेतले जातात. एनएसएसमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठीय नियमानुसार परीक्षांमध्ये ५ गुणांचा फायदा दिला जातो.

**विद्यार्थी विकास विभाग :-**

या विभागाच्यावतीने निर्भय कन्या कार्यशाळा, गिर्यारोहण शिबिर, वनस्पती ओळख कार्यशाळा आणि इतर उपक्रमांचे आयोजन केले जाते. आर्थिकदृष्ट्या गरीब असलेल्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाने 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना' कार्यान्वित केलेली आहे. साधारण १०० गरजू विद्यार्थी या योजनेचा लाभ घेतात. कार्यालय, महाविद्यालयाचा परिसर याठिकाणी विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार काम देऊन त्याबदल्यात त्यांना नियमानुसार मेहनताना दिला जातो.

**मानसिक-सामाजिक मार्गदर्शन केंद्र :-**

महाविद्यालयातील मानसशास्त्र विभागाच्यावतीने शै.वर्ष २०१८-१९ पासून दरवर्षी विद्यार्थ्यांवरील ताणतणाव कमी करण्याच्यादृष्टीने त्यांचे समुपदेशन करण्यासाठी या कक्षाची स्थापना करण्यात आली. शैक्षणिक, सामाजिक, कौटुंबिक व मानसशास्त्रीय समस्यांबाबत समुपदेशन सुरू झालेले आहे.

**डॉ. एम.आर. जयकर रोजगारक्षम कौशल्य कार्यक्रम :-**

निमशहरी/कामगार वस्तीतील विद्यार्थी जागतिक स्पर्धात्मक वातावरणासाठी सक्षम व्हावा या उद्देशाने हा उपक्रम महाविद्यालयात राबविला जातो. तृतीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांकडून प्रवेश अर्ज मागविण्यात येतात. विद्यापीठ मार्गदर्शक तत्त्वांनुसार सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना व ५०% विद्यार्थिनींना प्राधान्य देऊन दोन बॅचेसमध्ये १५० विद्यार्थ्यांना १० दिवसाचे प्रशिक्षण देण्यात येते. या प्रशिक्षण कालावधीत नेतृत्व गुण, संभाषण कौशल्य, सादरीकरण कौशल्य, मुलाखत तंत्र इ.विषयी मार्गदर्शन केले जाते. २०१८ पासून सॉफ्ट स्कील योजनेचे नामकरण वरीलप्रमाणे करण्यात आले आहे.



Scanned by CamScanner

**भाषा प्रयोगशाळा :**

महाविद्यालयात भाषा प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रयोगशाळेत दृकश्राव्य रेकॉर्डींग सुविधा आहे. तसेच अनेक प्रकारच्या दृकश्राव्य कॅसेटस उपलब्ध आहेत. पदवी तसेच पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी या प्रयोगशाळेचा लाभ घेत आहेत. भाषिक विकास यातून साधला जातो.

**वाणिज्य प्रयोगशाळा :**

वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक कौशल्ये देण्यासाठी वाणिज्य प्रयोगशाळा सुरू करण्यात आलेली आहे. वाणिज्य शाखेत अभिरूची निर्माण व्हावी, व्यावसायिक क्षेत्रात वाणिज्य शाखेतील ज्ञानाचा उपयोग करून घेण्याच्या उद्देशाने प्रयोगशाळा स्थापन करण्यात आली. या प्रयोगशाळेत टी.व्ही., व्हीसीआर, ओव्हर-हेड प्रोजेक्टर, इंटरनेट सुविधा उपलब्ध आहेत. विषयतज्ज्ञांची नियमित व्याख्याने आयोजित करण्यात येतात. वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांना यासंदर्भात गरजेनुसार योग्य ते मार्गदर्शन केले जाते.

**संशोधन सुविधा :**

विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती निर्माण होण्याच्यादृष्टीने 'आविष्कार' स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. विभागीय स्तरावर विद्यार्थ्यांचे संशोधन प्रकल्प स्वीकृत होवून पुरस्कार प्राप्त झालेत. विद्यार्थ्यांप्रमाणे प्राध्यापकांनाही संशोधन सुविधा पुरविल्या जातात. महाविद्यालयात 'संशोधन समिती'चे गठन करण्यात आलेले आहे. त्या समितीद्वारे प्राध्यापकांनी तयार केलेले संशोधन प्रकल्प अर्थसाहाय्य मिळण्यासाठी विविध संस्थेंकडे पाठविले जातात. महाविद्यालयातील बऱ्याच प्राध्यापकांना आर्थिक सहाय्य मंजूर झाले असून त्यांचे संशोधनाचे कामकाज सुरू आहे. बहुतांश शिक्षकांनी पीएच.डी. पदवी संपादन केली असून उर्वरित शिक्षक एम.फील./ पीएच.डी.चे संशोधन करत आहेत.

**महिला मंच तथा विशाखा समिती :-**

महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी खास महिला मंच स्थापन केलेला असून त्याद्वारे विद्यार्थिनींच्या अडीअडचणी व तक्रारी यांचे निवारण केले जाते. निष्णांत स्त्री- व्याख्यात्यांची व्याख्याने आयोजित केली जातात. महिलांचे सबलीकरण केले जाते.

**तक्रार निवारण कक्ष :**

महाविद्यालयात तक्रार निवारण समिती कार्यरत असून त्या समितीद्वारे विद्यार्थी व विद्यार्थिनींचे विविध प्रश्न सोडविले जातात.

**IQAC (अंतर्गत गुणवत्ता सुधार समिती)**

ही समिती NAAC च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार स्थापन करण्यात आली. ही समिती नॅक कमिटी येवून गेल्यानंतर प्रत्येक वर्षाचा आढावा घेत असते. महाविद्यालयाचा सर्वांगीण विकास अन् गुणवत्तावाढीसाठी ही समिती प्रयत्नशील असते. ही समिती विद्यार्थी, प्राध्यापक, विषयतज्ज्ञ आणि पालकांचा प्रतिसाद घेवून



Scanned by CamScanner

त्यानुसार योग्य तो बदल करीत असते. महाविद्यालयातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा दर्जा उच्च कसा राहील ,याविषयी समिती सातत्याने प्रयत्नशील असते.

## - प्रवेशासंबंधी महत्त्वाचे नियम -

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नियमानुसार खालील विद्यार्थी प्रवेश पात्र आहेत.

१) जे विद्यार्थी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या इ.१२ वीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेले असतील त्यांना प्रथम वर्षासाठी त्या त्या शाखेत गुणवत्ता यादीनुसार प्रवेश घेता येईल. अशा विद्यार्थ्यांना प्रवेश घेतांना १२ वीच्या परीक्षेची गुणपत्रिकेच्या दोन खऱ्या नकला व मूळ दाखला प्रवेश अर्जासोबत जोडला पाहिजे. डी.एड.परीक्षा इंग्रजी मेथड्सह पास असणाऱ्या विद्यार्थ्यास प्रथम वर्ष कला या वर्गात प्रवेश घेता येईल. (याबाबत विद्यापीठाचे वेळोवेळी येणारे आदेश बंधनकारक आहेत.) प्रवेश अर्जावर पालकांची सही आवश्यक आहे.

जे विद्यार्थी महाविद्यालयात १२ वी नंतर किंवा पदवीनंतर पदव्युत्तर वर्गात प्रवेश घेतील त्यांना इलिजीबिलीटी फॉर्म भरणे बंधनकारक राहील.

२) जे विद्यार्थी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाखेरीज दुसऱ्या राज्यातील १२ वी किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असतील अशा विद्यार्थ्यांना पात्रता प्रमाणपत्रासाठी विहित नमुन्यात अर्ज करावा लागेल. त्यासोबत नियमाप्रमाणे फी भरावी लागेल.

३) प्रथम वर्ष कला, विज्ञान, वाणिज्य, संगणकशास्त्र व पदव्युत्तर या वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना Eligibity (विद्यापीठाची पात्रता मान्यता) मिळाल्याशिवाय वार्षिक परीक्षेस बसता येणार नाही.

४) प्रवेश अर्जातील सर्व माहिती विद्यार्थ्यांनी पूर्ण भरली पाहिजे. प्रवेश अर्जावर स्वतःचा पासपोर्ट आकाराचा सध्याचा / नवीन फोटो चिटकवला पाहिजे. प्रवेशासंबंधीचा अंतिम अधिकार मा.प्राचार्यांना राहील.

५) जे विद्यार्थी प्रथम वर्षासाठी प्रवेश घेऊ इच्छितात अशा विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाने नेमुन दिलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून वैद्यकीय तपासणीचा दाखला महाविद्यालय सुरू झाल्यावर विहीत मुदतीत सादर केला पाहिजे.

६) प्रवेश अर्ज आवश्यक कागदपत्रांसह पूर्ण भरून नेमुन दिलेल्या समितीकडून तपासून उपप्राचार्य किंवा प्राचार्य यांची सही घेऊन प्रवेश घ्यावा.

७) **महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर मूळ दाखला कोणत्याही कारणास्तव परत मिळत नाही. म्हणून सदर दाखला महाविद्यालयास देण्यापूर्वी त्याच्या आवश्यक जादा सत्यप्रती करून ठेवाव्यात.**

८) विद्यापीठाकडून वेळोवेळी येणारी परिपत्रके व नियम विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहतील.

९) प्रवेश घेतल्यावर लवकरात लवकर ओळखपत्र घेणे.
(महाविद्यालयात आल्यानंतर ओळखपत्र गळ्यात घालणे बंधनकारक राहिल.)



Scanned by CamScanner

१०) विद्यार्थ्याने कार्यालयात कोणतीही फी भरल्यानंतर त्याची पावती (रिसीट) घेऊन ती स्वत:जवळ सांभाळून ठेवावी.

**⁕ प्रवेश अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे.**

- इ. १२ वी शाळा सोडल्याचा दाखल्याची मूळ प्रत व त्यांच्या दोन साक्षांकित झेरॉक्स प्रती.
- इ. १२ वी गुणपत्रिकेच्या दोन साक्षांकित प्रती. • म.वि.प्र.सुरक्षा फॉर्म.
- इतर बोर्ड वा टेक्निकल बोर्ड असल्यास मायग्रेशन सर्टिफिकेटची मूळ प्रत व एक साक्षांकित प्रत.
- जातीच्या दाखल्याच्या दोन साक्षांकित प्रती. • आधारकार्ड साक्षांकित प्रत.
- गॅप सर्टिफिकेटची मूळ प्रत व त्याची एक साक्षांकित प्रत.
- इ.बी.सी. फॉर्म उत्पन्नाचा दाखल्यासह एक प्रत
- शारीरिक व्यंग / अपंगत्व असणाऱ्या विद्यार्थ्यांनी सक्षम अधिकाऱ्याचे पत्र/अपंगत्व दाखला जोडावा.
- पी.टी.डब्ल्यु., एस.टी.डब्ल्यु. असल्यास तसा फॉर्म.
- बी.सी.स्कॉलरशीप अर्ज (सोबत जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला) रेशन कार्ड, नॉन क्रिमिलीअर, आधार कार्ड, बॅंक पासबुक, दाखला मुळ प्रत, मार्कशिट, सिडींग रिसीट, रहिवाशी दाखला तहसिलदार, प्रवेश पावती, शिक्षणात खंड असल्यास गॅप सर्टीफिकेट.
- प्रथम वर्ष/पदव्युत्तर भाग-१ प्रवेशासाठी विद्यापीठ पात्रता फॉर्म .

**टीप : इ.बी.सी. फॉर्म बरोबर तहसिलदार यांचा ८ लाखाच्या आत उत्पन्न असल्याचा उत्पनाचा दाखला जोडणे बंधनकारक आहे. विद्यार्थ्यांनी वेळोवेळी महाविद्यालयाकडून प्रसिद्ध झालेल्या सूचनांचे अवलोकन करावे.**

**ओळखपत्रासंबंधी महत्त्वाचे नियम :-**

१) महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांस ओळखपत्र घेणे बंधनकारक आहे.

२) ओळखपत्राशिवाय विद्यार्थ्यांला वर्गात, ग्रंथालयात, महाविद्यालयाच्या आवारात किंवा अन्य कार्यक्रमांना प्रवेश मिळणार नाही.

३) मुळ ओळखपत्र हरवल्यास अथवा गहाळ झाल्यास डुप्लीकेट ओळखपत्र घेण्यासाठी रू. १००/- फी आकारण्यात येईल.

४) विद्यार्थ्यांनी ओळखपत्रासाठी फॉर्म (I-Card form) ॲडमिशन झाल्यानंतर ग्रंथालयातून घेवून सुवाच्च अक्षरात भरावा आणि परत ग्रंथालयातच जमा करावा.

५) ओळखपत्र फॉर्म मधील माहिती विद्यार्थ्यांने काळजीपूर्वक भरणे आवश्यक आहे. नंतर कुठल्याही सबबीवर त्या माहितीमध्ये बदल करता येणार नाही.



Scanned by CamScanner

६) फॉर्म भरतांना स्वतःचा चालु स्थितीतील फोन नंबर द्यावा.

७) ओळखपत्र अर्जावर स्वतःचा पासपोर्ट साईज फोटो लावावा.

८) ओळखपत्रासाठी फोटो काढताना मागील बाजूचा पडदा पुढील रंगाचा असावा.

| | |
|---|---|
| कला शाखा | – हिरवा पडदा |
| वाणिज्य शाखा | – लाल पडदा |
| विज्ञान शाखा | – पिवळा पडदा |
| बी.व्होक शाखा | – निळा पडदा |
| संगणक शास्त्र | – काळा पडदा |

## ※ विविध विद्याशाखेतील प्रवेश पात्रतेचे नियम ※

**२०१७–१८ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम वर्ष कला, वाणिज्य, विज्ञान व संगणकशास्त्र या वर्गांचे प्रवेश ऑनलाईन पद्धतीने होत आहेत. सविस्तर माहितीसाठी महाविद्यालयात संपर्क साधावा.**

### कला विद्याशाखा :

बी.ए. अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षातून द्वितीय वर्षात जातांना विद्यार्थी प्रथम वर्षाच्या जास्तीत जास्त दोन विषयात अनुत्तीर्ण असला तरी द्वितीय वर्षाच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल. द्वितीय वर्षातून तृतीय वर्षात जातांना विद्यार्थी जास्तीत जास्त दोन विषयात अनुत्तीर्ण असला तरी त्यास तृतीय वर्षाच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल. मात्र असा विद्यार्थी प्रथम वर्षाच्या सर्व विषयात उत्तीर्ण असणे अपरिहार्य आहे.

### वाणिज्य विद्याशाखा :

बी.कॉम. अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षातून द्वितीय वर्षात जातांना विद्यार्थी प्रथम वर्षाच्या लेखी परिक्षेत जास्तीत जास्त दोन विषयात आणि प्रात्यक्षिक परीक्षेच्या एक विषयात अनुत्तीर्ण असला तरी त्यास द्वितीय वर्षाच्या प्रवेशास पात्र समजण्यात येईल. द्वितीय वर्षातून तृतीय वर्षात जातांना विद्यार्थी द्वितीय वर्षाच्या लेखी परीक्षेच्या जास्तीत जास्त दोन विषयात आणि प्रात्यक्षिक परीक्षेच्या एक विषयात अनुत्तीर्ण असला तरी त्यास तृतीय वर्षाच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल. मात्र त्याचवेळी प्रथम वर्षाच्या सर्व विषयात उत्तीर्ण असल्याशिवाय विद्यार्थ्यास तृतीय वर्षात प्रवेश मिळणार नाही.

### विज्ञान शाखा :

बी.एस्सी. व बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षातून द्वितीय वर्षात जातांना विद्यार्थी प्रथम वर्षाच्या जास्तीत जास्त चार विषयात (यापैकी लेखी परीक्षेच्या जास्तीत जास्त दोन विषयात आणि प्रात्यक्षिक परीक्षेचे जास्तीत जास्त दोन विषयात अनुत्तीर्ण असला तरी त्यास द्वितीय वर्षाच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल. द्वितीय वर्षातून तृतीय वर्षात जातांना विद्यार्थी जास्तीत जास्त तीन विषयात (यापैकी लेखी परिक्षेच्या जास्तीत जास्त दोन विषयात आणि प्रात्यक्षिक परीक्षेच्या एका विषयात) अनुत्तीर्ण असला तरी



Scanned by CamScanner

त्यास तृतीय वर्षाच्या प्रवेशास पात्र समजण्यात येईल. पात्र असा विद्यार्थी प्रथम वर्षाच्या सर्व विषयात उत्तीर्ण असणे अपरिहार्य आहे.

**व्यावसायिक पदवी अभ्यासक्रम – बी.व्होक (B.Voc.) :**

सन २०१८-१९ या वर्षापासून यु.जी.सी. नवी दिल्ली, संचलित आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मान्यताप्राप्त पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेले आहेत.

१) बी.व्होक – विद्युत उपकरणे निगा व दुरूस्ती
B.Voc. Electrical Appliances : Maintenance and Repairing.

२) बी.व्होक – अन्नप्रक्रिया तंत्रज्ञान
B.Voc. Food Processing Technology

३) बी.व्होक – योग आणि निसर्गोपचार
B.Voc. Yoga and Naturopathy

**अभ्यासक्रमातील टप्पे**

१. सहा महिने – सर्टीफिकेट कोर्स
1) Certificate course in Web Designing
2) Certificate course in Hindi
3) सर्टीफिकेट कोर्स इन इव्हेन्ट मॅनेजमेंट

२. प्रथम वर्ष – डिप्लोमा
1) Diploma course in Yoga
2) Diploma course in Sustainable Agriculture
3) Diploma course in Medical Laboratory Technology
4) Diploma course in Sericulture
5) Diploma course in English for Practical Purposes
6) डिप्लोमा – प्रशासकीय मराठी

३. द्वितीय वर्ष – ॲडव्हान्स डिप्लोमा

४. तृतीय वर्ष – ॲडव्हान्स डिग्री

**अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये :**

१. प्रवेशासाठी वयाची अट नाही.
२. प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या स्कॉलरशिप उपलब्ध आहे.
३. शैक्षणिक पात्रता १० + २ (कोणतीही शाखा) / आय.टी.आय. (२ वर्ष पूर्ण) / डिप्लोमा
४. कौशल्य आधारित व्यवसायभिमूख अभ्यासक्रम
५. प्रात्यक्षिकांवर अधिक भर
६. औद्योगिक प्रशिक्षण
७. शैक्षणिक सहली व अभ्यास भेटींचे आयोजन



Scanned by CamScanner

**२०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षात दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची रूपरेषा :**

विद्यार्थी ज्या विद्याशाखेतून पास असेल त्याच शाखेमध्ये प्रवेश मिळेल.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिपत्रकाप्रमाणे संबंधीत अभ्यासक्रमासाठी फी आकारणी करण्यात येईल. चार शाखांसाठी पदवी परीक्षेकरिता विद्यापीठाने नियुक्त केलेल्या आणि महाविद्यालयात शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाची व विषयांची माहिती पुढे दिली आहे. विषयांची निवड करताना विद्यापीठाने विहित केलेल्या विषय गटातून विद्यार्थ्यांना विषय निवडावे लागतील. याची सर्व वर्गाच्या विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

सन २००४-०५ पासून 'पर्यावरण-जागृती' विषय द्वितीय वर्ष कला/वाणिज्य/विज्ञान/संगणकशास्त्र वर्गांसाठी अनिवार्य आहे.

**कला शाखा  पदवी अभ्यासक्रम ( जून २०१९ पासून नवीन अभ्यासक्रम )**

**एफ. वाय. बी.ए.:**

एफ. वाय. बी.ए. वर्गासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांला प्रत्येक वर्षाकरिता म्हणजेच दोन्ही सेमेस्टर करीता सहा विषयांची निवड करणे अनिवार्य आहे. तीन वर्षात एकूण सहा सेमेस्टर करीता विषयांचा अभ्यास करावयाचा आहे. प्रथम वर्षी आपण निवड केलेल्या विषयांचा सह-संबंध हा तिन्ही वर्षाकरीता लागू असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी विषयांची निवड ही काळजीपूर्वक व बिनचूक करणे आवश्यक आहे. **प्रवेश घेतांना निवडलेले विषय आपणास प्राचार्यांच्या व विभाग प्रमुख यांच्या परवानगी शिवाय बदलता येणार नाहीत. विषयांची निवड झाल्यानंतर परस्पर विषय बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.** त्याच बरोबर विद्यापीठ नियमानुसार एकूण १४० क्रेडिट्स पदवी प्राप्त करण्याकरीता अनिवार्य आहे. अन्यथा आपणास पदवी मिळणार नाही. १३२ क्रेडिट हे नियमित अभ्यासक्रमानुसार पूर्ण करावयाचे आहेत. ०८ क्रेडिट्स हे आपणास मिळवावयाचे आहेत. त्या करीता महाविद्यालयात कला शाखेकरीता उपलब्ध एक्स्ट्रा क्रेडिट्स कोर्सेस द्वारे प्राप्त करता येतील त्या करीता घेण्यात येणाऱ्या परीक्षा, प्रात्यक्षिके, स्थळ भेट अहवाल इतर परीक्षा पद्धती ही विद्यापीठ नियमानुसार राबविण्यात येईल.

**एफ.वाय.बी.ए.साठी उपलब्ध विषय समूह** : (जून २०१९ पासून CBCS Pattern)

**ग्रुप ए : अनिवार्य इंग्रजी**

**ग्रुप बी : मराठी किंवा हिंदी या भाषे पैकी एक भाषा निवडणे अनिवार्य आहे**

**ग्रुप सी : खालीलपैकी कोणतेही ०४ विषयांची निवड करणे अनिवार्य आहे**

| | | |
|---|---|---|
| राज्यशास्त्र | समाजशास्त्र | प्रत्येक ग्रुप मधून एक विषय निवडणे अनिवार्य आहे. एकाच ग्रुप मधून दोन्ही विषयांची निवड करता येणार नाही |
| इतिहास | मानववंशशास्त्र | |
| अर्थशास्त्र | सामान्य इंग्रजी | |
| भूगोल | मानसशास्त्र | |



Scanned by CamScanner

**महत्वाच्या सूचना :**

१. ग्रुप ए : अनिवार्य इंग्रजी हा विषय प्रत्येक विद्यार्थ्याला निवड करणे आवश्यक आहे.

२. ग्रुप बी : मराठी किंवा हिंदी या भाषे पैकी एक भाषा निवडणे अनिवार्य आहे

३. ग्रुप सी मधून कोणतेही ०४ विषयांची निवड करणे अनिवार्य आहे. (एस.वाय.बी.ए. इंग्रजी विशेष स्तरावर घ्यावयाचा असल्यास एफ.वाय.बी.ए. ला सामान्य इंग्रजी हा विषय आवश्यक असेल.)

४. याच बरोबर एक्स्ट्रा क्रेडिट्स कोर्सेस पूर्ण करणे खालील विषय द्वितीय सत्रात अनिवार्य आहे

a. लोकशाही निवडणुका आणि सु-शासन

b. शारीरिक शिक्षण

**एस. वाय. बी.ए.**

एस.वाय.बी.ए. च्या वर्गात प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्याला त्याने एफ. वाय.बी.ए. वर्गात निवडलेले ०५ सामान्य स्तरावर विषया मधूनच एक विशेष स्तरावर (स्पेशल) विषय म्हणून निवडता येईल. अनिवार्य इंग्रजी व्यतिरिक्त कोणतेही ०३ विषय (सामान्य स्तर) निवडावेत. त्या पैकी एक स्पेशल विषय असेल. एस.वाय.बी. ए. प्रवेशार्थी विद्यार्थ्याने अनिवार्य, सामान्य व विशेष स्तरावर एकूण ०६ विषय निवड करावी.

| विषय | अनिवार्य | अनिवार्य | विशेष स्तर |
|---|---|---|---|
| अनिवार्य इंगजी | ०१ | -- | -- |
| जनरल विषय | -- | ०२ | -- |
| स्पेशल विषय | -- | ०१ | ०२ |
| एकूण | ०१ | ०३ | ०२ |
| विशेष स्तर उपलब्ध विषय | | | |
| इंग्रजी | मराठी | हिंदी | अर्थशास्त्र |
| राज्यशास्त्र | इतिहास | भूगोल | समाजशास्त्र |
| मानववंशशास्त्र | -- | -- | -- |

**महत्वाची सूचना :**

* वरील विषयांन बरोबर **MIL** आधुनिक भारतीय भाषा दोन्ही सेमेस्टर ला प्रत्येकी ०२ क्रेडीट कोर्सेस अनिवार्य आहे.
* स्पेशल विषय स्तरावर **SEC** स्कील एन्हान्सेमेंट कोर्से दोन्ही सेमेस्टर ला प्रत्येकी ०२ क्रेडीट कोर्सेस अनिवार्य आहे.
* या व्यतिरिक्त विद्यापीठ नियमानुसार 'पर्यावरण अभ्यास' हा विषय द्वितीय सत्रात सर्व शाखांना अनिवार्य आहे



Scanned by CamScanner

**टी.वाय.बी.ए. :**

टी.वाय.बी.ए. च्या वर्गात प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्याला अनिवार्य इंग्रजी व त्याने एस.वाय.बी.ए. वर्गात निवडलेले ०३ सामान्य स्तरावर विषय एक विशेष स्तरावर (स्पेशल) ०२ विषय म्हणून निवडता येईल एकूण ०६ विषय निवड करावी.

| विषय | अनिवार्य | अनिवार्य | विशेष स्तर |
|---|---|---|---|
| **अनिवार्य इंगजी** | ०१ | -- | -- |
| **जनरल विषय** | -- | ०२ | -- |
| **स्पेशल विषय** | -- | ०१ | ०२ |
| **एकूण** | ०१ | ०३ | ०२ |

**महत्वाची सूचना :**

* वरील विषयांन बरोबर
* फिनान्सीअल लिटरसी ०५ व्या सेमेस्टर ला ०२ क्रेडीट कोर्सेस अनिवार्य आहे.
* चित्रपट आस्वाद आणि समीक्षा ०६ व्या सेमेस्टरला ०२ क्रेडीट कोर्सेस अनिवार्य आहे.
* जेनेरिक एलेक्टीव कोर्सेस दोन्ही सेमेस्टर ला प्रत्येकी ०२ क्रेडीट कोर्सेस अनिवार्य आहे.
* या व्यतिरिक्त विद्यापीठ नियमानुसार सर्वेक्षण, स्थळ भेट अहवाल इतर उपक्रमांमध्ये सहभाग नोंदविणे गरजेचे आहे.

प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षा करीता प्रवेशित विद्यार्थ्यांनी जून २०१९ पॅटर्न नुसार प्रत्येक सेमिस्टरला ३० गुणांची अंतर्गत परीक्षा पास होणे अनिवार्य आहे. या मध्ये २० गुणांची मिड-सेम व १० गुणांची गृहपाठ पूर्ण करणे गरजेचे आहे. विद्यापीठ परीक्षा हि ७० गुणांची होईल. ७०:३० असा परीक्षा पद्धती आपणा करीता आहे. या विषयासोबत जास्तीचे एक्स्ट्रा क्रेडीट देखील पूर्ण करणे आवश्यक आहे.

**ब) वाणिज्य पदवी अभ्यासक्रम : (जून २०१९ पासून नवीन अभ्यासक्रम)**

एफ.वाय.बी.कॉम. वर्गासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला ६ पेपर्स व एक भाषेचा (मराठी/हिंदी/इंग्रजी) पेपर, एस.वाय.बी.कॉम. वर्गासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला ६ पेपर्स व एक 'पर्यावरण जागृती' हा आवश्यक पेपर आणि टी.वाय.बी.कॉम. वर्गासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला ६ पेपर्स असे प्रत्येक सेमिस्टरला असणार आहे.

एफ.वाय., एस.वाय., टी.वाय.बी.कॉम वर्गासाठी घ्यावयाचे विषय पुढील प्रमाणे.



Scanned by CamScanner

## F.Y.B.COM (CBCS Pattern from June 2019)

**Compulsory Core Group Subjects : Four subjects (For I and II Semester)**

101 – Compulsory English
102 – Financial Accounting
103 – Business Economic (Micro)
104 – A) Business Mathematics and Statistics
or
B) Computer Concepts and Applications

**OPTIONAL GROUPS (A or B)**

**GROUP A -** 105 – a) Organizational Skill Development
106 – b) Business Environment and Entrepreneurship

**GROUP B -** 105 – b) Banking and Finance
106 – c) Marketing and Salesmanship
107 – Any one of following languages
a) Marathi b) Hindi c) Additional English

**वरील कोर्सेस व्यतिरिक्त एफ.वाय.बी.कॉमसाठी खालील कोर्स पूर्ण करणे अनिवार्य आहे.**

* **Physical Education** (Compulsory Course)

**1) Democracy Election & Governance** (Compulsory Course)

2) Democracy , Election and Governance

3) I) Computerized Accounting II) Gender Sensitivity III) Value Education
IV) Employability Skill Enhancement Programme V) Intellectual Property rights law

**वरील पाचपैकी पहिल्या सेमिस्टरसाठी एक व दुसऱ्या सेमिस्टरसाठी एककोर्स पूर्ण करणे गरजेचे आवश्यक असणार आहे.**

**Practical :**

There will be practical examination for the F.Y.B.Com. for the subject Financial Accounting and oral exam for Marathi /Hindi and Additional English.

## S.Y.B.COM. (CBCS Pattern from June 2020)

**Compulsory / Core Subject : (for III and IV semester)**

201- Business Communication
202- Corporate Accounting



Scanned by CamScanner

203- Business Economics(Macro)
204- Business Management
205- Elements of Company Law

**Special Subject- Paper I (Any one of the following)**

206 (a)- Business Administration- I
or
206 (b) Marketing Management - I
or
206 (e)- Cost and Work Accounting- I
G) Environmental Awareness (Compulsory Course)

**Practical :**

There will be practical in the following subject carrying 20 Marks for each subject and the oral examinations of practical subject shall be held by University before theory examination.

a) Business Communication
b) Special Subject offered by the student.

## T.Y.B.COM (CBCS Pattern From June 2021)

**Compulsory / Core Subject : (for V and VI semester)**

351 - 1) Business Regulatory frame work
352 - 2) Advanced Accounting
353 - 3) International Economics
354 - 4) Auditing and Taxation

**Special Subject -**

355(A) 5) Business Administration II
356 (A) 6) Business Administration III
